WWW.DAILYAWAZ.COM

महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - १३६ ■ शनिवार दि.१३ डिसेंबर २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४


**✲ उत्सुकता ✲**




# शनीशिंगणापूर देवस्थान प्रकरणात हायकोर्टाचा सरकारला धक्का; कलेक्टरची नियुक्ती रद्द



**दै. आवाज वृत्तसेवा...**

(नेवासा प्रतिनिधी:-लखन वाल्हेकर) श्री शनीशिंगणापूर देवस्थान ट्रस्टमध्ये हस्तक्षेप करत राज्य सरकारने केलेली कारवाई बॉम्बे हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने गुरुवारी धुळीस मिळवली. देवस्थानच्या व्यवस्थापनासाठी कलेक्टरची -वाळपळीीरिी म्हणून केलेली नियुक्ती कोर्टाने बेकायदेशीर ठरवत ती रद्द केली. तसेच कलेक्टरने नेमलेली ११ सदस्यांची कमिटीही रद्द करण्याचे आदेश दिले.

हायकोर्टाने स्पष्ट केले की, शिंगणापूर देवस्थान अधिनियम २०१८ लागू करण्याची सरकारला मुभा आहे; पण त्या अधिनियमानुसार व्यवस्थापन समिती (Management Committee) प्रथम तयार करणे बंधनकारक आहे. समिती अस्तित्वात नसताना कलेक्टरला थेट -वाळपळीीरिी नेमण्याचा अधिकार सरकारला नाही, असे न्यायालयाने नमूद केले. कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार, २२ सप्टेंबर २०२५ रोजीचा राज्य सरकारचा GR रद्द ३० सप्टेंबर २०२५ रोजी कलेक्टरने नेमलेली कमिटी रद्द देवस्थानची पूर्वस्थिती (Status Quo Ante) पुन्हा लागू न्यायालयाने सरकारला सुनावले की, अधिनियमातील कलम ५ नुसार व्यवस्थापन समितीची रचना, नियम व प्रक्रिया निश्चित केल्याशिवाय कोणतीही तात्पुरती नेमणूक करता येत नाही. अधिनियमात 'स्टॉप गॅप' Administrator नेमण्याची तरतूद नसल्याने कलेक्टरची नियुक्ती सरसकट बेकायदेशीर ठरते. या निर्णयामुळे शनीशिंगणापूर देवस्थानवरील सर्व प्रशासकीय अधिकार पुन्हा निवडून आलेल्या विश्वस्त मंडळाकडे जाणार आहेत.

# मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षणाकरीता राजकीय पक्षांनी प्रतिनिधी नियुक्त करावेत

## जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांचे आवाहन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, दि. ११ (जिमाका वृत्तसेवा) : मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून मान्यता प्राप्त राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची (इङ-) तत्काळ नियुक्ती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे.

मतदार यादी अचूक व पारदर्शक करण्याकरीता मतदान केंद्रनिहाय मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्ती व अन्य विषयांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट, आम आदमी पार्टीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सांगितले की, सद्यःस्थितीत काही राज्यांमध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. पुढील टप्प्यात राज्यातही हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे मतदार याद्यांच्या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नियुक्ती करावी.

मतदार यादी अचूक व पारदर्शक तयार करण्यासाठी राजकीय पक्षांचे बीएलए यांची भूमिका महत्वाची आहे. त्यांनी प्रत्येक मतदान केंद्रावर बीएलएची नेमणूक करावी. बीएलओ आणि बीएलए यांनी समन्वयाने काम केल्यास मतदार यादीतील संभाव्य दुबार नावे, मृत, स्थलांतरीत मतदार आदी त्रुटी दूर करण्याची कार्यवाही सुलभ होईल. त्यामुळे मान्यता प्राप्त राजकीय पक्षांनी प्रत्येक बूथवर त्यांचे बीएलए नियुक्त करून त्यांची विहित नमुन्यातील माहिती तत्काळ संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे द्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी केले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मधुमती सरदेसाई यांनी मतदार नोंदणीबाबतची सविस्तर माहिती दिली.

# मुंबईत येणार जगातील सर्वात मोठा GCC (जीसीसी) प्रोजेक्ट; ४५ हजार रोजगार निर्माण होणार

## मायक्रोसॉफ्टसोबत एआय सहकार्याची मोठी घोषणा - मुख्यमंत्री

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि.१२ - महाराष्ट्राला GCC (जीसीसी) हब बनवण्याच्या दिशेने हा अतिशय महत्त्वाचा टप्पा असून ब्रुकफील्ड कंपनी मुंबईत सुमारे २० लाख चौरस फूट क्षेत्रावर आशियातील सर्वात मोठे Global Capability Center (GCC) अर्थात जागतिक क्षमता केंद्र उभारणार आहे. या प्रकल्पातून १५,००० थेट आणि ३०,००० अप्रत्यक्ष असे एकूण ४५,००० रोजगार निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जिओ कन्व्हेशन सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला, सीईओ, ANSR, विक्रम आहुजा, ब्रुकफिल्डचे अंकुर गुप्ता यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यासाठी अनेक महत्त्वाच्या गुंतवणूक व तांत्रिक भागीदारी प्रकल्पाच्या अनुषंगाने यावेळी चर्चा करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि उद्योगसुलभ वातावरणामुळे महाराष्ट्र जागतिक कॅपेबिलिटी सेंटरचे पसंतीचे ठिकाण ठरत आहे. नव्या GCC धोरणामुळे मोठ्या प्रमाणात कौशल्याधारित रोजगारनिर्मिती आणि आर्थिक वृद्धी साधली जाईल. जागतिक लॉजिस्टिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी ऋशवए देखील मुंबई-नवी मुंबई विमानतळ परिसरात आपल्या ऋछउ आणि इतर ऑपरेशन्ससाठी गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, मायक्रोसॉफ्टने आपल्या गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राचा



विचार करावा, याबाबत त्यांना विनंती केली असून सध्या देखील त्यांची सर्वात मोठी गुंतवणूक महाराष्ट्रामध्येच आहे. आगामी काळात मायक्रोसॉफ्ट मोठी गुंतवणूक करेल आणि महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेचे केंद्र बनवण्यासाठी पुढाकार घेईल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे

मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी आयोजित Microsoft AI Tour कार्यक्रमात सहभाग घेतला. सत्या नडेला यांनी महाराष्ट्र सरकारसोबत विकसित केलेल्या Crime AIOS प्लॅटफॉर्मचे विशेष प्रदर्शन या कार्यक्रमात केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्राने दिलेले मॉडेल देशभरासाठी दिशा देणारे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

सत्या नडेला यांच्या सोबत झालेल्या या बैठकीत आरोग्य, शिक्षण, कृषी आणि सरकारी सेवा वितरणासाठी AI Co-Pilots विकसित करण्यावर चर्चा झाली. मायक्रोसॉफ्टने भारतातील त्यांच्या १७ अब्जांच्या सर्वात मोठ्या गुंतवणुकीत महाराष्ट्राला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

महाराष्ट्राने विकसित केलेल्या चर्तीशश्र प्लॅटफॉर्ममुळे सायबर आणि आर्थिक गुन्हे ३-४ महिन्यांच्या ऐवजी फक्त २४ तासांत शोधता येतात. ज्यामुळे लोकांचे पैसे वाचत आहेत आणि गुन्हेगारांना शोधणे अधिक जलद झाले आहे. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, उद्योग विभागाचे सचिव डॉ. अनबलगन, यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.




# भारतीयांच्या जिवनावश्यक वस्तुतील 'रॉकेल' मार्केट मधुन होतय गायब !

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**रमेश भोंगळ :-**

भारतीयाच्या जिवनावश्यक वस्तुतील स्वंयपाकासाठी इंधन म्हणुन महत्त्व पुर्ण भुमिकेत राहिलेले रॉकेल वरिल सबसिडी केंन्द्र सरकारने देणे बंद केल्याने वापर कमी होत जिवनावश्यक वस्तू च्या अग्रभागी असणारे उग्र वासाचे ज्वलन-शील रॉंकेल मार्केट मधुन गायब झाले तर रॉंकेल आलय चा बोर्ड ही आत्ता बंद दुकानाबाहेरुन दिसेनासा झाला आहे.

नव्वदीच्या दशकात जिवनावश्यक वस्तू म्हणुन सबसिडी च्या रुपाने पिवळ्या केशरी रेशन कार्ड वर सर्वसामान्य नागरिकांना प्रती कुपनावर पाच लिटर दोन रुपये तिस पैसे दराने सार्वजनिक वितरण व्यवस्थे द्वारे मिळणारे रॉंकेल आज मार्केट मधुन हळू-हळू गायब होतय त्याकडे लक्ष देण्यास कुनाला वेळ नाही. एकेकाळी जिव कि प्राण असणाऱ्या रॉंकेल ने स्टोव्ह द्वारे स्वयंपाक शिजवून घातला तर कदिंल चिमणी ने घरात उजेड दिला.

आधुनिकीकरणाच्या वाटचालीत कमी परिश्रमात क्षणिक आर्थिक बचतीचा लाभ घेण्यात पुढे असणाऱ्या भारतीय नागरिकांनी रॉंकेल वापराचा चालु पर्याय बासनात गुडांळुन ठेवत शासनाने दाखवलेल्या स्वप्नातील एल. पि. जी गॅंसटाकी चा पर्याय निवडल्याने दैनंदिन जिवनात गॅंस चे महत्त्व वाढुन रॉंकेल चा कमी होवू लागलेल्या वापरामुळे केंन्द्र शासनाने हळुवार रॉंकेल वरिल सबसिडी बंद करत मार्केटमध्ये रॉंकेल चे भाव वाढवून पेट्रोलियम कंपन्या ना खुल्या बाजार भावाने इंधन व नॅंचुरल गॅंस च्या विक्रीस केन्द्र शासनाने परवानगी दिल्याने १४.५० वजनाची घरगुती वापर असलेली गॅंस टाकी ९५० रुपयाला खरेदी करावी लागत असुन बॅंक खात्यावर रिफंडा द्वारे मिळणारी सबसिडी ची रक्कम हि बंद केली. हातावर पोट असणाऱ्या असंघटित मजुर वर्गापुढे कमी बजेट चा रॉंकेल हा पर्याय हि बंद झाल्याने गॅंसटाक्या च्या मनमानी भाववाढीचा सामना भारतीय नागरिकांना करावा लागत आहे याकडे शासनाचे पुरते दुर्लक्ष झालेले दिसते.

वाळलेली लाकडे चुलीत भट्टीत घालून त्यावर स्वंयपाक तयार करून शिजवलेल्या अन्नावर उदरभरण करण्याची क्रिया भारतीयांना शेकडो वर्षांपासून न्यात असतांना १९०० व्या शतकात ब्रिटीश कालखंडात औद्योगिक क्रांती मुळे उद्योग व्यवसायात रॉंकेल चा वापर वाढु लागला तसा भारतीयांच्या स्वयंपाका साठी जिवनावश्यक वस्तू म्हणून रॉंकेल स्टोव्ह मध्ये पेटले जावुन अन्न शिजवु लागले तर कंदील चिमणी घराघरात उजेड देवु लागली. १८५३ मध्ये ब्रिटिश वैद्य अब्राहम गेसनर यांनी डांबरातून ज्वलनशील द्रव काढण्याची पद्धत विकसित केली तेव्हा केरोसीन चा आधीकृत शोध लागला. १८५९ मध्ये औद्योगिक प्रमाणात रासायनिक उत्खनन सुरू झाल्याने रॉंकेल एक महत्त्वाची गरज म्हणून उदयास आले. पेट्रोलियमच्या अंशात्मक उर्ध्व पातनातुन मिळणारे रॉंकेल हे एक ज्वलनशील हायड्रोकार्बन द्रव्य आहे. सर्वात जास्त रॉकेल निर्मिती करणारे देश म्हणून अमेरिका आणि जपानच नाव येतं या यादीत चीन दक्षिण कोरिया स्पेन आणि भारत देशाचा देखील समावेश होतो. २००३ पासून भारतात रॉकेल आयात करण केंन्द्र सरकारने बंद केलंय रॉकेल निर्मितीत आत्मनिर्भर असलेल्या भारताने २०२०-२१ मध्ये २१ देशात ३७४.९७ मिलियन णड डॉंलर्स च्या किमती चे रॉकेल निर्यात केले रॉकेल ने आपल्या आयुष्यात अन्नही दिलं आणि कंदील गॅंसबत्ती च्या रूपान उजेडही दिला. आज कंदिलाची जागा विजेच्या बल्पाने घेतली, रॉकेलचा स्टोव्ह जाऊन गॅस सिलेंडर इंडक्शन असे पर्याय आले तरीही घरामध्ये चूल पेटायची ती रॉकेल मुळे. २०१६ मध्ये मोदी सरकारने उज्वला योजना आणली आणि घरोघरी गॅस कनेक्शन कसं पोहोचेल याबाबत काम करायला सुरुवात केली या योजनेअंतर्गत २५ एप्रिल २०२२ पर्यंत नऊ कोटी १७ लाख गॅस कनेक्शन देण्यात आले तर उज्वला योजनेअंतर्गत एक कोटी १८ लाख कनेक्शन देण्यात आले सहाजिकच तो वापरणाऱ्या घरात आता रॉकेल ची गरज उरली नाही सोबतच केंद्र सरकार ने अशी घोषणा केली की २०३० पर्यंत भारत केरोसिन मुक्त करण्यात येईल त्यानुसार पावलं उचलण्यात आली. कारण काय म्हणे तर ?रॉंकेल च्या वापराने प्रदुषणात वाढ होते व लाकुड तोड वाढते दिल्ली हे देशातल पहिलं केरोसीन मुक्त शहर ठरलं आहे सध्या रेशनकार्ड वर रॉंकेल मिळणही बंद झालय. देश केरोसीन मुक्त करण्यासाठी शासनाने दुकानांना मिळणारा रॉकेलचा कोटा बंद केलाय सुरुवातीला रॉकेल परवडायचं कारण शासन त्याच्यावर सबसिडी द्यायचं त्यांनाही माहिती होतं कित्येकाचा आयुष्य रॉकेल वर अवलंबून आहे. भारतियांच्या जिवनातील अत्यावश्यक गरजेत मोडणारे रॉंकेल चे अनन्यसाधारण महत्त्व ओळखुन चित्रपट सृष्टित अमिताभ बच्चन यांच्या प्रमुख भूमिकेतील देशप्रेमी चित्रपटात रॉंकेल वाटपावरुन दाखवलेली हाणामारी असो कि मिनाकुमारी यांच्या अभिनयाने गाजलेल्या मेरे अपने चित्रपटात विनोद खन्ना व शेत्रुगन सिंन्हा यांच्या संवादातील वाक्य होते 'खबरदार अगर ईस मोहल्ले का घासलेट दुसरी तरफ गया ! यावरुन रॉंकेल चे महत्त्व लक्षात येते.

डिझेल पेक्षा रॉंकेल मार्केटमध्ये कमी दराने उपलब्ध होत असल्याने खाजगी अवजड चारचाकी वाहना बरोबर राजदूत जावा येझदी मोटारसायकल मध्ये इंधन म्हणून रॉंकेल चा सर्यासपणे होत असलेला वापर बघता शासनाने काळाबाजारी रोखण्यासाठी केमिकल युक्त निळ्या रंगाचे रॉंकेल सार्वजनिक वितरण व्यवस्थेत आनले व त्यास पर्याय म्हणून फ्रि सेल रॉंकेल ची विक्री हि वाढवली. क्षनिक काही पैशाच्या मोहापायी रॉंकेल चा वाहनामध्ये केलेला वापर इंजिन वारंवार नादरुस्त होण्यात झाला. २०१९-२० मध्ये चार हजार कोटी रॉंकेल वर सबसिडी देणाऱ्या केन्द्र सरकारनं २०२१ मध्ये सबसिडी चा आकडा २६७७ ओटीवर आणला यंदाच्या आर्थिक वर्षात सरकारने केरोसिनवर कोणतीही सबसिडी दिलेले नाही. सहाजिकच खुल्या बाजारात रॉंकेल चे भाव शंभरी पार पोहचले. नुसती उपलब्धताच कमी झालेले नाही, तर लोकांचा वापरही कमी झाला आहे २००७-८ मध्ये वर्षाला ९ मिलियन मेट्रिक टन केरोसीन वापरणाऱ्या भारतात मार्च २०२२ मध्ये फक्त ०.११ मिलियन मेट्रिक टन केरोसीन वापरलं गेलं सध्या गॅसचे वाढलेले भाव बघता अनेकांनी गॅस सिलेंडर घेणे बंद करून चूल पेटवायला घेतली तर इथेही मदतीला रॉकेल लागतय. शासनाने गॅंस च्या मोठ्या टाक्या ऐवजी सर्वसामान्य नागरिकांना कूठेही विना कागदपत्राचे वाजवी दरात उपलब्ध होतील असे ५ किलोचे गॅंस सिलेडर उत्पादन वापरावर भर दिला असता तर रॉंकेल बंद करण्याचा हेतू सफल झाला असता कधीकाळी आपला मुख्य आधार असलेलं रॉकेल असा फारस वापरात दिसत नाही. महाराष्ट्रात जेव्हा पूर आला होता अण जनजीवन विस्कळीत झालं होतं तेव्हा शासनाने मदत म्हणून किराणा सोबत रॉकेल हि लोकांना दिलं होतं. रेशनच्या दुकानासमोरुन जाताना कधी रॉकेलचा वास आला की मन आठवणीत जाते रॉंकेल भरलेल्या स्टोव्ह चा धगधगता तापलेला बर्नर अण होणारा फर्फर आवाज त्यावर चपाती शेकणारी आई अन... सांयकाळी कंदिलाची काच राखेने पुसुन त्यात भरलेल रॉंकेल व पेटवलेल्या दिव्याखाली केलेला अभ्यास तर तासणतास ड्रम घेवुन नंबर साठी लावलेली लाईन अण दिवाळीत रंगात मिसळलेल रॉंकेल ने पेट्या कोठ्याना दिलेला रंग सायकलच्या रिंगाला आलेला गंज पुसण्यासाठी केलेला वापर या गोष्टी आजही कायम आठवणीत आहे.

****

## खिर्डी साठे, डोंगरगाव ल पा तलाव क्षमता वाढवा - जलहक्क संघर्ष समितीची मागणी

### मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री विखे यांना निवेदन



**लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी** - येवला तालुक्यातील शेती सिंचनाच्या दृष्टीने महत्वाचे असलेले डोंगरगावं लपा तलाव व खिर्डी साठे लपा तलाव यांची क्षमता वाढ व दुरुस्ती करावी, या दोन्हीही तलावात निम्म्याने गाळ साठला आहेत. धरण रेषा व सांडवा दुरुस्ती करणे गरजेचे आहे, त्या साठी महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) मध्ये तातडीने समाविष्ट करून प्रलंबित कामे पूर्ण करावी अशी मागणी, जलहक्क संघर्ष समितीचे संयोजक भागवतराव सोनवणे यांनी केली आहे.

या प्रकल्पातील मुख्य कालवे आणि उपकालव्यांची कामे दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सिंचन सुविधांचा अभाव असल्याने पिकांचे उत्पादन घटते असून शेतीवर थेट परिणाम होत आहे. या प्रकल्पांमुळे हजारो एकर क्षेत्राला पाणी मिळू शकते, परंतु अपूर्ण कामांमुळे शेतकऱ्यांना अपेक्षित दिलासा मिळत नाही, असे सोनवणे यांनी निवेदनात म्हंटले आहे.

**सरासरी पर्जन्य मानात वाढ व मांजरपाडा प्रकल्पने पाण्याची उपलब्धता वाढली आहे. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन ही कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याची गरज आहे**

**- भागवतराव सोनवणे :- जलहक्क संघर्ष समिती, येवला.**

**वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा जाहिरात तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

*** संपर्क * ९५४५९ १०१७७**

## शासकीय आरक्षित मैदानावर मालकीहक्काचा वाद - नागरिकांची एकजूट, प्रशासनाला हरकतींचा वर्षाव

उल्हासनगर नंबर चार सुभाष टेकडी परिसरातील गेली ५० ते ६० वर्षे नागरिकांनी जपून ठेवलेले एकमेव शासकीय खेळाचे मैदान सध्या मालकीहक्काच्या वादामुळे चर्चेत आले आहे. युवकांच्या क्रीडागुणांना वाव देणारे आणि सामाजिक उपक्रमांचे केंद्रस्थान ठरलेले हे मैदान, काही व्यक्ती स्वतःचे मालकीचे असल्याप्रमाणे वापरत असल्याची गंभीर तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे.

माहिती अधिकाराखाली मिळालेल्या महत्त्वाच्या दस्तावेजानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे की, सदर भूखंड हा शासकीय व आरक्षित असून कोणत्याही व्यक्तीचा वैयक्तिक मालकीहक्क त्यावर मान्य नाही. तरीदखील काही मंडळींनी सेटलमेंट कमिशनर कार्यालयात मालकीसनद मिळवण्यासाठी अर्ज दाखल करून प्रकरण पुढे नेल्याचे समोर आले आहे.

प्रकरण उपविभागीय अधिकारी (उल्हासनगर) कार्यालयाकडे पाठवण्यात आल्यानंतर त्यांनी भू-मापन कार्यालयास प्रत्यक्ष सर्व्हे करून अहवाल मागवला. दरम्यान, बहुजन मुक्ती पार्टी ने




मैदान वाचवण्यासाठी स्थानिक जागरूक नागरिक, सामाजिक संघटना आणि क्रीडा प्रेमींनी मोठ्या प्रमाणात सह्यांसह हरकती दाखल केल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर मंडळ अधिकारी श्री. बोराडे यांनी आज मैदानाचा प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी भेट दिली. यावेळी हरकती दाखल केलेल्या ॲड चंदनशिवे, सामाजिक कार्यकर्ते भोयर, तसेच प्रहार संघटनेचे पाटील या सह अनेक नागरिकांनी व संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यांची भेट घेऊन संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती दिली व मैदान बळकावण्याच्या प्रयत्नांना तीव्र विरोध नोंदवला.

नागरिकांच्या मते-काही राजकीय मंडळी पडद्यामागे आर्थिक फायद्यासाठी ही जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असून हा कट उघडकीस आला आहे. सुभाष टेकडीवासीयांनी एकमुखाने इशारा दिला आहे की, हे मैदान हा आमचा वारसाहक्क! कोणत्याही छुप्या राजकीय डावपेचांना आम्ही झुकणार नाही. टेकडीकर योग्य वेळी योग्य उत्तर द्यायला तयार आहेत.

या जनआंदोलनामुळे मैदान बळकावण्याचे प्रयत्न होणार नाहीत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. पुढच्या पिढ्यांसाठी हे खेळाचे मैदान जतन करण्याचा निर्धार सर्वच स्तरांतून व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टॅंड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# चांदेश्वरीच्या घाट रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहनधारकांची होते कसरत

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव तालुक्यातील जातेगाव बोलठाण मार्गे देशातील उत्तरेकडील राज्यांना मराठवाडा आणि दक्षिणेतील राज्यांना जोडणारा व कनेक्टिव्हिटी साठीचा जवळच्या कासारी जवळील चांदेश्वरी या अवघड वळणाच्या घाटातील रस्त्याची मोठमोठे खड्डे पडल्याने चाळीस किलोमीटर अंतर जाण्यासाठी बस ला दिड तासापेक्षा जास्त अवधी लागत आहे. औट्राम घाट बंद करण्यात आल्याने चाळीसगाव मार्गे जाणारी वाहतूक मनेगांव फाटा, बोलठाण जातेगाव, कासारी ते मन्ह्याड फाटा या मार्गाने वळविण्यात आल्याने संपूर्ण ४० किलोमीटर रस्त्याची चाळण झाल्याने वाट लागली आहे. त्याचप्रमाणे ढेकू गावापासून पडधाडी मार्गे जाणारा न्यायडोंगरी रस्ता आणि घाटातील रस्त्यावर देखील मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्त्याकडे तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांसह सार्वजनिक बांधकाम उप विभाग नांदगाव ने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. सविस्तर वृत्त असे की, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील कन्नड येथून चाळीसगाव कडे जाणाऱ्या रस्त्यावरील औट्राम घाट गेल्या वर्षभरापूर्वी उच्च न्यायालयाच्या आदेशाने अवजड वाहनांसाठी बंद केल्यामुळे त्या रस्त्याने जाणारी वाहतूक शिऊर बंगला - लोणी - तलवाडा मार्गाने वळविण्यात आली होती. घाटातील रस्त्यावर पडलेले खड्डे

परंतु तलवाडा ते कासारी यादरम्यान छत्रपती संभाजी नगर हाद्दीत नवीन सिमेंट रस्त्याचे रस्त्याचे काम सुरू असून देशातील दक्षिण- उत्तर राज्यांमध्ये जाणारे मोठमोठे मालवाहू ट्रक खाजगी लक्झरी




बसेस, तापी नदीची वाळू वाहतूक करणारे शेकडो वाहने आणि बोलठाण येथे बाजार समिती असल्याने तेथे शेतातील माल विक्रीसाठी येणारे असे रात्रंदिवस दररोज हजारो वाहनांच्या अतिरिक्त वाहतूक सुरू झाल्याने नांदगाव तालुक्यातील रोहिले या गावाजवळ असलेल्या खारी खामगाव मध्यम प्रकल्पापासून सुमारे ते मन्हाडफाटा दरम्यान ४० कि.मी. रस्त्याची चाळण झाली आहे.त्याचप्रमाणे ढेकू गावापासून पडधाडी मार्गे जाणारा न्यायडोंगरी रस्ता आणि घाटातील रस्त्यावर देखील मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या रस्त्याकडे तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांसह सार्वजनिक बांधकाम उपविभाग नांदगाव ने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

याबाबत तालुक्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार हा रस्ता सध्या सुरू असलेल्या अवजड वाहतुकीच्या हिशोबाने तयार केलेला नसल्याने त्याला विलाज नाही असे उत्तर दिले.

विशेष: जास्त रहदारीचा असलेल्या नांदगाव रस्त्यावरील कासारी जवळील चांदेश्वरी घाटातील रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दररोज अनेक वाहने नादुरुस्त होवून रस्त्यावर उभी राहिल्याने रहदारी ठप्प होत असल्याने स्थानिक नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. याच घाटात अवघड वळणाच्या ठिकाणी कमकुवत बांधकाम करण्यात आलेली संरक्षण भिंत पडल्याने या ठिकाणी अनेक वाहने खोल दरीत गेल्यामुळे अनेकांचे जीव गेलेले आहेत.

याबाबत नांदगाव येथील सार्वजनिक बांधकाम उप विभागाच्या वतीने कुठल्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आलेली नाही. एकंदरीत औट्राम घाट बंद करण्यात आल्याने मनेगांव फाटा, बोलठाण जातेगाव, कासारी ते मन्ह्याड फाटा हा रस्ता नव्याने तयार करण्याची मागणी होत आहे.

# शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आय एस पी/सी एन पी प्रेसचे जगदीश गोडसे यांच्याकडून अनोखी भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक प्रतिनिधी/ विश्वजीत शहाणे

--ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माननीय शरदचंद्रजी पवार यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त मुंबई येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात करन्सी नोट प्रेस आणि इंडिया सिक्युरिटी प्रेस यांच्या वतीने त्यांच्या वाढदिवसाचा उत्सव साजरा करण्यात आला.

या प्रसंगी आय.एस.पी. मजदूर संघाचे सेक्रेटरी जगदीश गोडसे यांनी पवार साहेबांना स्वातंत्र्यपूर्व काळातील खास भेट म्हणून १९६४ सालच्या जॉर्ज सहाव्या कालखंडातील १५० चांदी व चलनातील नाण्यांचा संच त्यामध्ये महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ,छत्रपती शिवाजी महाराज ,संत तुकाराम, अशा अनेक महान विभूतींच्या कार्याचा गौरव म्हणून केंद्र शासनाने जे नानी तयार करून चलनात आणली या तयार नाण्यांमध्ये साहेबांची शेतकरी राजा म्हणून एक प्रतिमा तयार करून साहेबांचा एक फोटो त्यामध्ये लावून साहेबांना सुपूर्द केला. या ऐतिहासिक भेटीने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

शरद पवार यांचा वाढदिवस साजरा




करण्यासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. मात्र, आय.एस.पी. मजदूर संघाच्या वतीने दिलेली ही ऐतिहासिक भेट सर्वांचे आकर्षण ठरली. या नाण्यांमध्ये स्वातंत्र्यपूर्व भारताच्या आर्थिक इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग झळकतो.

या अनोख्या भेटीसाठी कृतज्ञता व्यक्त करताना शरद पवार म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळातील ही नाणी केवळ ऐतिहासिकच नाहीत, तर भारताच्या आर्थिक प्रगतीचा वारसा जतन करण्याचे प्रतीक आहे.

आय.एस.पी. मजदूर संघाने हा संच पवार साहेबांना भेट देऊन त्यांच्या नेतृत्वाचा सन्मान केला. संघाचे सेक्रेटरी जगदीश गोडसे यांनी सांगितले की, पवार साहेब हे देशाच्या विकासासाठी दिलेल्या योगदानासाठी प्रेरणास्थान आहेत. ही भेट त्यांच्या कार्याचा आदर व्यक्त करण्यासाठी आहे.

मुंबई येथील या विशेष सोहळ्याने पवार साहेबांच्या वाढदिवसाला एक ऐतिहासिक रंगत दिली. या प्रसंगी त्यांना देशभरातून शुभेच्छांचा वर्षाव झाला.

यावेळी संघटनेचे जगदीश गोडसे, सुंदररमण साहेब अण्णा सोनवणे, संदीप व्यवहारे, संतोष कटाळे,राजाभाऊ लहांगे,सुनील नाईक सचिन दिवटे,सचिन चिडे, सोमनाथ काळे, विनोद घाडगे ,प्रवीण निकुंभ,हिरामण आव्हाड, आप्पा जगताप, मच्छिंद्र जाधव, यांच्यासह प्रतिनिधी उपस्थित होते.

# प्रभाग १८ मधील एसबी प्लाझा सोसायटी परिसरातील पवार वाडी रस्त्याची दुरुस्ती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक - प्रभाग १८ मधील एसबी प्लाझा सोसायटी, बोराडे मळा येथील पवार वाडी रस्त्याची अत्यंत बिकट दुरावस्था झाली होती. खड्ड्यांनी भरलेल्या या रस्त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. महानगरपालिकेच्या (मनपा) बांधकाम विभागाने या रस्त्याचे पूर्णपणे डांबरीकरण करून घेऊन दिले असून, स्थानिक नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.शिवसेना प्रभाग १८ चे कार्यकर्ते श्री. रोहित (शिवा) गाडे यांनी या कामासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला.

त्यांच्या प्रयत्नांमुळे हे काम लवकरात लवकर पूर्ण झाले. रस्ता डांबरीकरणानंतर नागरिकांनी गाडे यांचे आभार मानले आणि मनपावर विश्वास व्यक्त केला.

स्थानिक नागरिक म्हणाले, रस्ता चांगला झाल्याने आता प्रवास सोयीचा झाला आहे. यापुढे अशा कामांना प्राधान्य मिळावे.




# शासकीय अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून उल्हासनगरमध्ये अनाथ तरुणाचा थाटामाटात विवाह

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सुरेश जगताप / उल्हासनगर :

उल्हासनगर शहरात आज एक हृदयस्पर्शी आणि समाजाला प्रेरणा देणारा आगळावेगळा विवाह सोहळा पार पडला. शासकीय मुलांचे बालगृह, उल्हासनगर-५ येथे वाढलेल्या एका अनाथ तरुणाचा विवाह शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत कुटुंबीयांच्या भूमिकेतून मोठ्या थाटामाटात पार पाडला.

रितेश असे या तरुणाचे नाव असून २००७ साली अवघ्या ६ ते ७ वर्षांचा असताना तो शासकीय बालगृहात दाखल झाला होता. याच बालगृहात त्याचे बालपण गेले, शिक्षण पूर्ण झाले आणि आज तो स्वतः याच संस्थेत कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. काही दिवसांपूर्वी त्याचा विवाह ठरला असला तरी संपूर्ण विवाह सोहळ्याची जबाबदारी कशी पार पाडावी, हा प्रश्न त्याच्यासमोर उभा होता. रितेशने ही अडचण बालगृहाच्या अधीक्षक व समुपदेशकांकडे मांडताच, उल्हासनगरमधील विविध शासकीय संस्थांतील अधिकारी व कर्मचारी एक कुटुंबाप्रमाणे पुढे सरसावले. सर्वांनी वर्गणी जमा करून विवाहासाठी हॉल, विधी, जेवण आणि इतर सर्व आवश्यक तयारी केली. हळदी समारंभ थेट बालगृह परिसरातच आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतः च्या मुलाप्रमाणे रितेशचा विवाह पारंपरिक पद्धतीने, विधीवत आणि थाटामाटात लावून दिला. या विशेष उपक्रमासाठी ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच बालकल्याण समितीच्या अध्यक्षा राणी बैसाणे यांचे मोलाचे योगदान राहिले.

या विवाह सोहळ्याच्या यशस्वी आयोजनात अधीक्षिका प्रमिला मोहापे, अधीक्षक डॉ. भूषण साखरे, प्रवीण दिंदोर्डे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रामकृष्ण रेड्डी, समुपदेशक सचिन जाधव, सूर्यकांत मुंडे, संतोष खोपडे, अमित गुंजाळ, तसेच समाजसेवक जयप्रकाश बैसाणे आणि नितीन सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

ठाणे जिल्ह्यात अनाथ बालकांच्या पुनर्वसनासाठी




अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम मानला जात असून, समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा आणि अनेकांना प्रेरणा देणारा ठरला आहे. अनाथ व निराधार बालकांनाही समाजात सन्मानाने उभे करता येते, हा विश्वास या विवाह सोहळ्याने अधिक दृढ केला आहे.

# डोंगरगाव येथील विद्यामंदिराते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती उत्साहात साजरी




**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्था संचलित, माध्यमिक विद्यामंदिर डोंगरगाव तालुका निफाड विद्यालयात स्व.लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्तअशोकराव नागरे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे सपोनि भास्करराव शिंदे लासलगाव पोलीस स्टेशन तालुका निफाड व व्याख्याते सचिन होळकर प्रमुख उपस्थिती डी.बी. कादरी पत्रकार विंचूर व शैक्षणिक समिती स्कूल कमिटी अध्यक्ष प्रकाश काकड व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. भाऊराव सांगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही. जे. आघाव यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे व्याख्याते सचिन होळकर आपल्या मार्गदर्शनातून मुंडे साहेबांचा जीवन परिचय करून दिला. व विद्यार्थ्यांचा अभ्यास व आरोग्य विषयी मार्गदर्शन केले. शेवटी अध्यक्षीय मनोगत अशोकरावजी नागरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार के. टी.आघाव यांनी केले.

कार्यक्रमास गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## विंचूर परिसरात बिबट्याची दहशत

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - परिसरात बिबट्याची दहशत पुन्हा वाढली असून शेळ्या व कुत्र्यांवर हल्ल्यांच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे. परिस्थितीची गंभीर दखल घेत माजी उपसभापती विलास गोरे यांनी वन विभागाने तात्काळ पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. नुकताच न्यू ब्लॉसम स्कूलच्या मागे बिबट्याचे दर्शन झाले तसेच येथील गोरे वस्ती नजीक बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# न्यू ब्लॉसम्स इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये शालेय क्रीडा महोत्सव साजरा




**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर (प्रतिनिधी) - येथील न्यू ब्लॉसम इंग्लिश मेडियम स्कूल व समर्थ प्राथमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.म.वि.प्र. संस्थेचे क्रीडा शिक्षक नामदेव जाधव यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष अँड संजय दरेकर, सचिव अविनाश दुसाने, पत्रकार संदीप शिरसाट, संस्थेचे संचालक सतिश सांगळे, कैलास भालेराव, संजय झाल्टे हे होते. शिक्षिका पूजा सोनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.विद्यार्थ्यांची आपापल्या हाऊस नुसार परेड करण्यात आली. तर लेझीम पथकाने विविध कला सादर केल्या.दरम्यान स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्वर, कास्य मेडल देऊन गौरविण्यात आले. पालकांसाठी आयोजित स्पर्धेत पालकांनी देखील मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. याप्रसंगी न्यू ब्लॉसम्स् च्या प्राचार्या ज्योती माठा, समर्थ प्राथमिकच्या मुख्याध्यापिका पूजा निकम, समन्वयक सोनाली कामडी,क्रिडा शिक्षक गणेश माळी आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगिता जगताप व प्रांजल सावंत यांनी केले. तर काजल शिंदे आभार प्रदर्शन केले.

# अवैध होर्डिंग्ज राजकीय पुढाऱ्यांचे शुभचिंतक का लावतात, त्यांना कोणीच ओळखत नाही काय?

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनदरम्यान वर्धा मार्गावरील मेट्रोच्या खांबावर ६० पेक्षा अधिक अवैध होर्डिंग्ज लावण्याची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने घेतली आहे. न्यायालयाने महापालिकेला शहरातील सर्व अवैध होर्डिंग्ज २४ तासांच्या आत हटवण्याचे कठोर आदेश दिले आहेत याचे मनापासून स्वागत.तसेच आयुक्तांनी अवैध होर्डिंग्ज काढण्याच्या कारवाईचा अनुपालन अहवाल सादर करावा लागेल,असेही आदेश नमूद केले.म्हणजे राजकीय पुढारी चांगल्या व स्वच्छ शहराला विद्रुपिकरण करतांना दिसतात त्यामुळे न्यायालयाने अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आपण जेव्हा स्वच्छ नागपूर, स्वच्छ शहर, स्वच्छ राज्य म्हणतो तेव्हा अशा परिस्थितीत नेत्यांच्या स्वागतासाठी शहरभर पोस्टर्स,बॅनर्स,कट-आऊटस व होर्डिंग्ज लावण्याची काय गरज? राज्यातील पुढाऱ्यांचे होर्डिंग्ज लावने म्हणजे यांना कोणीच ओळखत नाही का?त्यामुळे तर होर्डिंग्ज लावत असावेत असे तर नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो.एका शब्दात सांगायचे म्हणजे आपण यांना पाहिलत काय असेच काही असावे असे मला वाटते.अवैध होर्डिंग्जचा कायदा अनेक वर्षांपासूनचा आहे तरी राजकीय पुढारी नियमांची पायमल्ली करून स्वतःच्या प्रसिद्धीसाठी संपूर्ण नियम धाब्यावर ठेवतात हे कसले लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी यांना तर जनता निवडून देते यांना राज्याला किंवा शहराला ओळख दाखविण्याची गरजच काय? त्यामुळे यांना कशाला हवी प्रसिद्धी आणि आपल्या प्रसिद्धीसाठी संपूर्ण नियम धाब्यावर ठेवत हा तर लोकशाहीचा,सर्वसामान्यांचा, कायद्याचा व नियमांचा मोठा अपमानच म्हणावा लागेल. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या नेत्यांच्या स्वागतासाठी शहरात अवैध होर्डिंग्ज लावण्यात आले यावर दिनांक १० डिसेंबर बुधवारला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा जोरदार दणका बसला या होर्डिंग्ज बहाद्दरांना कारणे दाखवा नोटीस बजावून प्रत्येकी पाच लाख रुपये उच्च न्यायालयात जमा करण्याचे निर्देश का दिले जाऊ नये,अशी विचारणा करावी,असा आदेश न्यायालयाने महानगरपालिका आयुक्तांना दिला.मी तर म्हणेनल की ज्या-ज्या राजकीय पुढाऱ्यांचे अवैध होर्डिंग्ज दिसत असेल अशांच्या आमदारकीवर लगाम असला पाहिजे व शुभचिंतक व राजकीय पुढारी यांच्यावर पाच लाख रुपये नाही,तर १० लाख दंड आकारला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांमध्ये व शुभचिंतकामध्ये सुधारणा होईल. आपणाला कल्पना असेल की राज्यामध्ये अवैध होर्डिंग्जच्या अनेक जिवघेण्या घटना झाल्या आहेत ही बाब माहीत असुनही अवैध होर्डिंग्ज लावतात ही दुर्भाग्यपुर्ण बाब आहे.यामध्ये मुंबई परिसरात घाटकोपर येथे दिनांक १३ मे २०२४ ला वादळीवारा व पाऊस आला यामध्ये मोठ्या प्रमाणात मुंबईकरांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे स्थानिक प्रशासन व सरकारच्या हलगर्जीपणामुळे मुंबईत असलेल्या अवैध होर्डिंगने १४ मुंबईकरांचा बळी घेतला व ८० पेक्षा जास्त गंभीर जखमी झालेत होते.त्याचीच पुनरावृत्ती दिनांक २ ऑगस्ट २०२४ ला ठाणे जिल्ह्यातील कल्याणमध्ये सहजानंद चौकात एक भलेमोठे होर्डिंग ४० फुट उंचीवरून कोसळले होते यात दोन जण गंभीर जखमी झाले होते.अशीच घटना कल्याणमध्येही होर्डिंग्ज कोसळल्याने झाली होती.त्यामुळे अवैध होर्डिंगच्या बाबतीत प्रश्न निर्माण होतो की,नागरिकांचा जीव कवडीमोलाचा झाला आहे का?त्यामुळे सरकारने, प्रशासनाने अवैध होर्डिंग्जच्या बाबतीतील गांभीर्य लक्षात घेऊन होर्डिंग्ज मालकांवर,शुभचिंतकावर व राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. कोणतेही अवैध होर्डिंग्ज असो त्याचे गंभीर परिणाम सामान्य नागरिकांना भोगावे लागतात.अवैध होर्डिंग्ज लावणाऱ्यावर सरकारने व प्रशासनाने कठोर कारवाई करावी जेणेकरून भविष्यात होर्डिंग्जनी होणाऱ्या दुर्घटना रोखण्यास प्रशासनाला मोठी मदत होईल व विद्रुपीकरण टाळता येईल यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. महापालिका किंवा प्रशासनाने जाहिरातदारांना किंवा राजकीय पुढाऱ्यांना अवैध होर्डिंगबद्दल नोटीस बजावुन सुध्दा होर्डिंग्ज हटवत नसेल तर कठोर कारवाई झालीच पाहिजे.अवैध होर्डिंग्जवरून असे लक्षात येते की राजकीय पुढारी,जाहिरातदार व मनपा प्रशासन यात काही साठगाठ तर नाही ना!अशी शंका सर्वसामान्य नागरिकांच्या मनात नेहमीच भेडसावत असते.वाहतूक सिग्नलसह दिशादर्शक व सावधानतेचा इशारा देणाऱ्या फलकांवर किंवा त्याजवळ होर्डिंग्ज लावल्यास वाहनचालकांचे लक्ष विचलित होते त्यामुळे त्यांचे अपघात होतात.तसेच अवैध होर्डिंग्ज शहराचे आणि देशाचे विद्रुपीकरण करते. वाहनचालकाचे होर्डिंगकडे जेव्हा अचानक लक्ष जाते तेव्हा मोठ्या दुर्घटना होण्याची शक्यता असते आणि अशाप्रकारच्या दुर्घटना सुध्दा झाल्या आहेत.या संपूर्ण घटनांची दखल राजकीय पुढारी,जाहिरातदार, शुभेच्छा देणारे नेते यांनी घेतली पाहिजे.देशाला,राज्याला व शहरांना स्वच्छ व सुंदरतेच्या दिशेने न्यायचे असेल तर होर्डिंगच्या बाबतीत राजकीय पुढारी व जाहिरातदार यांच्या मुसक्या आवळणे अत्यंत गरजेचे आहे आणि त्या दिशेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वाटचाल सुध्दा सुरू केली आहे.त्यामुळेच शहरातील चोवीस तासात २८०३ अवैध होर्डिंग्ज हटले.अशीच कारवाई संपूर्ण राज्यात सन्माननीय उच्च न्यायालयाने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.

जय हिंद.



**रमेश लांजेवार (प्रदेश प्रवक्ता)**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# बुबळी येथील विद्यार्थ्यांची ज्ञानयात्री क्षेत्र भेट सहल उत्साहात

## आदिवसी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच घडले नाशिक दर्शन




**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड

सुरगाणा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा बुबळी येथील तीस ज्ञानयात्री शालेय विद्यार्थ्यांच्या

सहलीचे आयोजन करण्यात आले होते.यामुळे तीस विद्यार्थ्यांमध्ये पंधरा मुली व पंधरा मुलांचा समावेश करण्यात आला होता.हे सर्व ग्रामीण आदिवासी भागातील शेतकरी, मजूर वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते. काहींनी तर प्रथमच नाशिक जिल्ह्याचे ठिकाण पाहिले होते.

यामध्ये या क्षेत्र भेट सहलीत यशवंतराव चव्हाण तारांगण, नाणे संशोधन केंद्र,फाळके स्मारक,स्वातंत्र्यवीर सावरकर तरण तलाव, जिल्हा परिषदेची नूतन वास्तूचे दर्शन घडविण्यात आले.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी सरोज जगताप यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता विद्यार्थ्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली. जगताप यांनी भविष्यात तुम्हांला काय बनायचे आवडेल असे विमल भोये या आठवीत शिकणा-या विद्यार्थ्यांनीस विचारले असता तीने सांगितले की मला तुमच्या सारखे अधिकारी बनायचे आहे. असे उत्तर दिल्यावर चक्क त्या विद्यार्थीनीस खुर्चीवर बसवून तिची मनिषा पुर्ण केली.

मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी उत्साहात प्रेमळपणे हसतमुखाने मार्मिक पणे संवाद साधल्याने विद्यार्थी व शिक्षक भारावून गेले.या क्षेत्र भेट सहलीचे आयोजन गटशिक्षणाधिकारी अल्पा देशमुख, विस्तार अधिकारी धनंजय कोळी,महेश नेहे, केंद्र प्रमुख उखाराम भोये यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक पांडुरंग पवार, पद्माकर वाघमारे, देवराम खांडवी, सुरेश पवार, सविता सुर्यवंशी, बसचालक साहेबराव निकम यांनी क्षेत्र भेट यशस्वीते करीता परिश्रम घेतले.

वाढदिवस शुभेच्छा, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात

* संपर्क *
९५४५९ १०१७७/ ८९९९९ २१९९४